

# मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे पालकांचीही जबाबदारी : डॉ. मुजूमदार

कोल्हापूर, ता. ६ : मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होणे ही शिक्षकांबरोबरच पालकांचीही जबाबदारी आहे. वर्ण, जातीभेद या क्षुल्लक गोष्टी आहेत फक्त आत्मविश्वास ही एकच महत्त्वाची बाब आहे असे प्रतिपादन पद्मभूषण डॉ. शा.ब मुजूमदार यांनी केले.

मुकुल माधव विद्यालयाच्या चौथ्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून सिंबायोसिस कॉलेजच्या संचालिका डॉ. विद्या येरवडेकर, मुकूल माधव फाऊंडेशनचे संस्थापक विश्वस्त प्रल्हाद छाब्रिया, व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया, आनंद पंडित, एस. के.जैन, फिनोलेक्स इंडस्ट्रिजचे व्यवस्थापकीय संचालक सौरभ धानोरकर, फिनोलेक्स इंडस्ट्रिजचे संचालक संजय आशर, अतिरिक्त पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकूर, अतिरिक्त जिल्हाधिकारी अजित पवार आदी उपस्थित होते.

डॉ. शा. ब. मुजूमदार पुढे म्हणाले की, पूर्वी तुमच्याकडे किती जमीन आहे, पैसा किती आहे यावरुन तुमची श्रीमंत ओळखली जायची. मात्र आजच्या काळात तुमच्याकडे असलेल्या ज्ञानावर तुमचे भविष्य अवलंबून आहे. त्यामुळे ज्ञान हीच शक्ती आहे ज्याची आपण पूजा केली पाहिजे. ते पुढे म्हणाले देशाचा विकास व्हायचा असेल तर आरोग्य आणि शिक्षण या दोन्ही गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. आणि मुकूल माधव फाऊंडेशन ही नेमक याच दोन्ही गोष्टीमध्येच पुढाकार घेत असल्याने ही कौतुकास्पद गोष्ट आहे. जो देतो तो देव आणि राखतो तो राक्षस या शब्दांत त्यांनी दानाचे महत्त्व पटवून दिले. सिंबायोसिसच्या संचालिका डॉ. विद्या येरवडेकर म्हणाल्या, मुलांना लहान वयातच संगणकाचे प्रशिक्षण मिळणे गरजेचे आहे. मात्र पालकांनाही प्रशिक्षित करावे जेणेकरुन मुलांचा अभ्यास घेताना त्यांना अडचणी येणार नाहीत. त्यांनी ग्रामीण भागातील या पहिल्याच इंग्रजी माध्यमातील शाळेमध्ये उपलब्ध असलेल्या अभ्यासेत्तर विविध उपक्रम आणि खेळांच्या सुविधांचे ही कौतुक केले.